लोकअदालत Exh-02

<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कामठी यांचे न्यायालयात</u>

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. 475/2026

| | | | |
|---|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याची तारीख | - | 28/02/2026 |
| २ | फिर्याद दिल्याची तारीख | - | 01/03/2026 |
| ३ | फिर्यादीचे नाव | - | महाराष्ट्र राज्य सरकार तर्फे<br>पोलीस स्टेशन न. कामठी |
| ४ | आरोपीचे नाव, वय व पत्ता | - | दिपक राजेश शिरसाळे<br>वय - 21 वर्षे, व्यवसाय - ड्रायव्हर<br>राह. उड्डा ता. कुरई<br>जि. शिवनी |
| ५ | गुन्हयांचा तपशील | - | |

तुम्ही वर नमूद आरोपीने दि. 28/02/26 रोजी 13:00 वाजताचे सुमारास बस स्टँड कामठी समोर रोडवर येथे तुम्ही तुमचे ताब्यातील वाहन हे रहदारीस अडथळा होईल अशारितीने उभी करुन रस्त्यावरील अथवा सार्वजनिक नौकानयन मार्गावरील कोणत्याही व्यक्तीला धोका, अटकाव किंवा इजा करील असे ठेवलेले मिळून आले व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता चे कलम २८५ अन्वये गुन्हा केला असल्याचे तोहमत आहे.

तारीखः 14/3/२०२६

14/3/26
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कामठी.

<u>आरोपीचे निवेदनः</u>

प्रश्न क्र.१. तुम्हाला फिर्यादीची नक्कल मिळाली का ?
उत्तर - होय.
प्रश्न क्र.२. तुम्हाला आत्ता वाचुन दाखविलेला आरोप समजला का ?
उत्तर - होय.
प्रश्न क्र.३. तुम्हाला गुन्हा कबुल आहे का ?
उत्तर - होय

आरोपीची सही

तारीखः 14/3/२०२६

14/3/26
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कामठी.

# न्यायनिर्णय

आरोपीला दोषारोपपत्रा सोबत हजर केले. आरोपीने, इच्छापूर्वक गुन्हा कबुल केला व शिक्षेवेळी कमीत-कमी शिक्षा करणेची मागणी केली. आरोपीने इच्छापूर्वक गुन्हा कबुल केला व निशाणी .... कडे गुन्हा कबूल असल्याचा अर्ज दाखल केला. त्या अर्जवरील सहया व मजकूर स्पष्ट व मान्य व कबूल केला. तसेच कमीत कमी दंडाची शिक्षा करावी अशी मागणी केल्याने मी त्याला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २५२ अन्वये दोषी ठरवून पुढीलप्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## आदेश

१. आरोपीला याद्वारे भारतीय न्याय संहिता चे कलम २८५ अन्वये गुन्हा केल्याचे आरोपात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २५२ नुसार दोषी ठरवुन त्यास रुपये २००/- दंडाची शिक्षा करणेत येते. तसेच दंडाची रक्कम न भरल्यास १० दिवस साध्या कारावासाची शिक्षा करणेत येते.

२. प्रकरण येणे प्रमाणे निकाली काढण्यात येते.

14/3/26

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कामठी.

तारीखः 14/3/२०२६

Vide No- 381/26
dt. 14/03/26 file
Amt. 200/- paid

14/03/26